रुपी को-ऑप. बँक लि., पुणे (अवसायनात)

मुख्यकचेरी : प्लॉट क्र.बीसी/१, गेट नं.५ च्या शेजारी, पेट्रोलपंपाच्या मागे, गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे ४११०३७

☎ 020-24270148/0548 www.rupeebank.com ✉ admin@rupeebank.com

दि.०१.०७.२०२५

:: जाहीर सूचना ::

:: एलएल.बी.उमेदवारांना रिटेनरशिप (Retainership) वर काम करण्याची संधी ::

बँकेस विविध न्यायालयांमध्ये वसुली संदर्भातील कारवाईसाठी व खाली नमूद कामकाजासाठी रिटेनरशिपवर एलएल.बी. उत्तीर्ण उमेदवारांची आवश्यकता आहेः

- ⇨ विविध न्यायालयांमध्ये वसुली संदर्भातील दावे दाखल करणे, अर्ज सादर करणे, कोर्टात म्हणणे मांडणे.
- ⇨ थकबाकीदार/जामीनदार/कर्जदार यांच्याशी संबंधित कागदपत्रांचा अभ्यास करणे.
- ⇨ थकबाकीदार/जामीनदार/कर्जदार यांच्या तारणी / विनातारणी मालमत्ता शोधणे, सापडलेल्या मालमत्तांवर जप्तीची कारवाई करणे, ई-जाहीर लिलाव पुकारणे इ.

वरील कामकाजासाठी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण असलेल्या गरजू एलएल.बी. पदवीधारकांची 'रिटेनर' म्हणून नियुक्ती करावयाची आहे. पात्र उमेदवारास महाराष्ट्र सहकारी कायदा, सिक्युरिटायझेशन ॲक्ट २००२, मालमत्ता हस्तांतरण कायदा, मुद्रतीचा कायदा, भारतीय करार अधिनियम १८७२ आणि तत्सम कायद्यांचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

- ▶ रिटेनरशिप कालावधीः ११ महिने (अकरा महिने) राहील व तो संबंधित उमेदवाराच्या कामकाजावर आधारीत राहील आणि बँकेच्या आवश्यकतेनुसार सदरचा कालावधी वेळोवेळी वाढविण्यात येवू शकेल.
- ▶ मानधनः रु.१५,०००/- प्रति महिना (अक्षरी रुपये पंधरा हजार फक्त) राहील.
- ▶ अन्य कोणतेही लाभ, सवलत किंवा रजा यासाठी उमेदवार पात्रता राहणार नाही.
- ▶ ही केवळ विशिष्ट कामकाजापुरती रिटेनरशीपवर नियुक्ती राहील.

तरी इच्छुक, पात्र व गरजू उमेदवारांनी त्यांचे अर्ज दि.१२.०७.२०२५ पर्यंत शैक्षणिक पात्रतेच्या व अन्य आवश्यक प्रमाणपत्रांच्या झेरॉक्ससह बँकेच्या वर नमूद केलेल्या पत्त्यावर समक्ष / पोस्टाने पाठवावेत. उमेदवारांच्या निवडीबाबत अवसायक यांचा निर्णय अंतिम राहील.

अधिक माहितीसाठी सरव्यवस्थापक अथवा मुख्यकचेरी, प्रशासन विभागाशी संपर्क साधावा.

अवसायक

रुपी को-ऑप. बँक लि., पुणे (अवसायनात)